# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक ११ वा शुक्रवार दि.०७ जून २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## काँग्रेसच्या खासदारांचे शतक पूर्ण; विशाल पाटील काँग्रेसमध्ये दाखल

नवी दिल्ली : महाराष्ट्राच्या राजकारणात सर्वात जास्त लक्ष वेधून घेतलेल्या सांगली लोकसभा मतदारसंघात अपक्ष उमेदवार विशाल पाटील १ लाखांच्या मताधिक्यांनी जिंकून आले. याठिकाणी मविआकडून उद्धव ठाकरेंनी उमेदवार दिला होता. मात्र ठाकरेंची मशाल पाडून विशाल पाटील खासदार झाले. आता त्याच विशाल पाटलांनी विश्वजित कदमांसोबत दिल्लीत जात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडे पाठिंबा पत्र दिले आहे.

मल्लिकार्जुन खरगे यांनी ट्विट करून याबाबत माहिती दिली आहे. ते म्हणाले की, महाराष्ट्रात अहंकारी राजकारणाला जनतेने पराभूत केले. सामाजिक न्याय, समता आणि स्वातंत्र्यांसाठी लढणा-या छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या आपल्या प्रेरणादायी दिग्गजांना ही योग्य श्रद्धांजली आहे. सांगलीतील खासदार विशाल पाटील यांनी काँग्रेसला पाठिंबा दिल्याचे त्यांनी सांगितले. विशाल पाटलांच्या या पाठिंब्यामुळे देशात काँग्रेस खासदारांनी शतक गाठल्याचे दिसून येते.

ठाकरेंनी व्यक्त केली होती नाराजी

सांगली लोकसभा मतदारसंघात उद्धव ठाकरेंनी चंद्रहार पाटलांना उमेदवारी दिली होती. मात्र त्याठिकाणी काँग्रेस नेते विशाल पाटील इच्छुक होते. मात्र काँग्रेसचा विरोध डावलून ठाकरेंनी चंद्रहार पाटलांची उमेदवारी कायम ठेवली. त्यामुळे विशाल पाटलांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला. याबाबत ठाकरे गटाकडून विशाल पाटलांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. विशाल पाटलांना त्यांच्या नेत्यांनी समजवावे असे उद्धव ठाकरेंनी म्हटले होते. मात्र ठाकरे गटाचा विरोध डावलून सांगलीत काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी विशाल पाटलांचा प्रचार केला. त्यामुळे या निवडणुकीत विशाल पाटील विजयी झाले.



दरम्यान, सांगली लोकसभा मतदारसंघाचे भाजपा उमेदवार संजय पाटील यांनी २०१४ आणि २०१९ असे दोनवेळा मतदारसंघाचे नेतृत्व केले. २०२४ च्या निवडणुकीत त्यांची हॅट्ट्रिक होणार होती, पण पक्षातंर्गतच विरोध झाल्यामुळे त्यांची हॅट्ट्रिक हुकली आहे. केंद्र सरकारच्या धोरणाविरोधात जनतेतून मोठ्या प्रमाणात उठाव झाला. मराठा, धनगर, ओबीसी आरक्षणाचाही मुद्दा निवडणुकीत चांगलाच गाजला. हे सर्व प्रश्न विशाल पाटील यांच्या पथ्यावर पडले. जत विधानसभा मतदारसंघ वगळता सांगली, मिरज, खानापूर, पलूस-कडेगाव, तासगाव-कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघात विशाल पाटील यांना चांगले मताधिक्य मिळाले.

## शेअर मार्केटमधील सर्वात मोठा घोटाळा

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीतील मतदानाच्या शेवटच्या दिवशी आलेले एक्झिट पोल आणि त्याआधी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शेअर मार्केटबद्दल केलेल्या विधानांचा दाखला देत काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांनी गंभीर आरोप केले आहेत. सरकारच्या माध्यमातून ठरवून शेअर मार्केटबाबत संभ्रम निर्माण करण्यात आला आणि यासाठी खोट्या एक्झिट पोल्सचा आधार घेण्यात आला, असा दावा राहुल गांधी यांनी केला आहे. शेअर मार्केटच्या इतिहासातील हा सगळ्यात मोठा घोटाळा असून याा संपूर्ण प्रकरणाची जेपीसीच्या माध्यमातून चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. शेअर मार्केट घोटाळ्याचा आरोप करताना राहुल गांधी म्हणाले की अमित शाह यांनी आधी



मे महिन्यात लोकांना शेअर्स खरेदी करण्याचे आवाहन केले आणि ४ जूननंतर आमच्या जागा ४०० पार होणार असल्याचे सांगत शेअर्सच्या किंमती वाढतील, असा दावा केला. ज्या चॅनलला शाह यांनी मुलाखत दिली होती त्याच चॅनलला दिलेल्या मुलाखतीत पंतप्रधान मोदी यांनीही शेअर्सबाबतचे आवाहन केले. त्यानंतर १ जून रोजी खोटे एक्झिट पोल आणून शेअर मार्केटमध्ये संभ्रम निर्माण केला गेला. मात्र ४ जून रोजी खरा निकाल आल्यानंतर सर्व शेअर्स पडले. या सगळ्यात सर्वसामान्य गुंतवणूकदारांचे तब्बल ३० लाख कोटी रुपये बुडाले आणि काही मोजक्या परदेशी गुंतवणूकदारांना हजारो कोटी रुपयांचा फायदा झाला. हा सगळ्या एका मोठ्या कटाचा भाग होता असा घणाघाती आरोप राहुल गांधींकडून करण्यात आला आहे.

## खासदार डॉ शिवाजी काळगे यांच्यावर राजकिय, सामाजिक, शैक्षणिकसह विविध क्षेत्रातील मान्यवराकडून शुभेच्छाचा वर्षाव.

लातुर / प्रतिनिधी :- लोकसभा निवडणूकिचे निकाल नुकतेच जाहीर करण्यात आले आणि लातुर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ.शिवाजी काळगे प्रचंड मताधिकक्याने विजयी झाले. या विजयानंतर राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख तसेच नूतन खासदार डॉ शिवाजी काळगे यांच्यावर राजकीय,सामाजिक,शैक्षणिक यासह विविध क्षेत्रातील मान्यवराकडून शुभेच्छाचा वर्षाव केला जात आहे. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख तसेच लातूरचे नूतन खासदार डॉ.शिवाजी काळगे यांची कंधार येथील शिवसेना (उबाठा) शिष्टमंडळ, मातंग समाज शिष्टमंडळ लातुर, शहर जिल्हा काँग्रेस सेवादल लातुर यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींनी बुधवार दि.०५ मे रोजी सायंकाळी बाभळगाव निवासस्थानी जाऊन सदिच्छा





भेट घेतली. या भेटीत नुकतीच झालेली लोकसभा निवडणूक आणि या निवडणूकित महाविकास आघाडीला मिळालेले अतुलनीय यश याबद्दल शिष्टमंडळाकडून माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख तसेच नूतन खासदार डॉ शिवाजी काळगे यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी माजी मंत्री विनायकराव पाटील,बस्वराज पाटील नागराळकर,रवींद्र काळे,अभय साळुंके, जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे,लातुर शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष ॲड. किरण जाधव,विजय देशमुख,ॲड.समद पटेल,संतोष देशमुख,अनुप शेळके,हमीद शेख,डॉ. अरविंद भातांब्रे,अजित माने,गणेश एस.आर. देशमुख, प्रीती भोसले, सुनीता आरळीकर, लक्ष्मण कांबळे, अहेमद खान पठाण, कैलास कांबळे, तबरेज तांबोळी,आसिफ बागवान,इसरार सगरे,व्यंकटेश पुरी, इम्रान सय्यद,अकबर माडजे,महेश काळे,अभिजित इगे,अभिषेक पतंगे,मोहन माने,परमेश्वर जाधव (ता. अध्यक्ष कंधार शिवसेना उबाठा),उत्तम चव्हाण (पंचायत समिती सदस्य),पंडितराव देव कांबळे, जी.एम.पवळे,अनिल ढोबळे,प्रा.शिवाजी जवळगेकर, नागनाथ डोंगरे, नारायण कांबळे, जी.ए.गायकवाड, ॲड.अंगद गायकवाड,राज क्षीरसागर,ॲड.संतोष मस्के,दशरथ मस्के,लिंबराज कांबळे,बालाजी साळुंके, अमोल शिंदे,सुभाष सूर्यवंशी,राजा माने,सुरज राजे, श्री.गंडाले, इस्माईल शेख तसेच लातुर शहर जिल्हा काँग्रेस सेवादलाचे सुपर्ण जगताप,ॲड.सुनील गायकवाड,राहुल देशमुख,राजाभाऊ देशमुख,रामराजे देशमुख यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## माझा एकही नाही सांसद, तरी मला हवं मंत्रिपदं!

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सलग तिस-यांदा एनडीए सरकार स्थापन होणार आहे. या लोकसभा निवडणुकीत एनडीएला २९२ जागा मिळाल्या. भाजपला २४० जागा मिळाल्या आहेत. तर, भारत आघाडीला २३४ जागा मिळाल्या. हा पंतप्रधान नरेंद्र मोदींचा नैतिक पराभव असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे. दरम्यान सत्तास्थापनेच्या गडबडीत रामदास आठवले यांनी मात्र ''माझा एकही नाही सांसद, माझा एकही नाही सांसद, तरी मला हवं मंत्रिपद'' असे म्हणत केंद्रात स्थापन होणा-या एनडीए सरकारमध्ये मंत्रीपदाची मागणी केली आहे.दरम्यान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पुढील पाच वर्षे आपले सरकार चालेल, असा विश्वास एनडीएमधील घटक पक्षांना व्यक्त केला. सत्तास्थापनेच्या गडबडीत रामदास आठवले यांनी केंद्रात स्थापन होणा-या एनडीए सरकारमध्ये मंत्रीपदाची मागणी केली आहे. आठवले अशा पक्षाचे अध्यक्ष आणि नेते आहेत ज्यांच्याकडे फक्त एक खासदार आहे आणि तेही राज्यसभेत, रामदास आठवले स्वत: राज्यसभेचे खासदार आहेत, लोकसभेत भारतीय रिपब्लिकन पार्टीचा एकही खासदार नाही. विशेष म्हणजे यावेळी आठवले यांच्या पक्षाने निवडणूकही लढवली नाही.आठवलेंनी मंत्रिपदाची मागणी केली. ते म्हणाले, मी ८ वर्षे राज्यमंत्री आहे, आता मला केंद्रीय मंत्रीपद मिळाले आहे. आरपीआय म्हणजेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा बाबासाहेब आंबेडकरांचा पक्ष आहे. बाबासाहेबांचे संविधान वाचवण्यासाठी मोदींनी अनेक गोष्टी केल्या. त्यामुळे आम्हाला मंत्रिपद मिळावे, अशी आमची यावेळी मागणी आहे. याचे कारण म्हणजे मी सलग ८ वर्षे राज्यमंत्री असून माझा पक्ष देशभरात काम करतो आणि नेहमीच प्रामाणिकपणे एनडीएसोबत राहिलो आहे.

## विद्रोही ग्रुप च्या वतीने गरजू विद्यार्थ्यांना रजिस्टर वाटप



लातूर :- लातूर शहरातील विलास नगर ( बौद्धनगर ) या कष्टकरी वस्त्यांतील गरजू विद्यार्थ्यांना विद्रोही ग्रुपचे संस्थापक ड. अतिश चिकटे यांच्यावतीने ५००० वह्या (रजिस्टर ) चे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष दिशा प्रतिष्ठान लातूरचे मार्गदर्शक अभिजीत देशमुख हे होते,तर प्रमुख पाहुणे म्हणून रिपाईचे राज्य सचिव चंद्रकांत चिकटे,शाम जाधव, प्रा.आनंद लांडगे,रमेश शृंगारे,अब्दुल शेख होते.याप्रसंगी कामगार कष्टकरी कुटुंबातील शालेय विद्यार्थ्यांना विद्रोही ग्रुपच्या वतीने मोफत वाटप करण्यात आले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाम काळे,आकाश ससाने,नितीन कदम,नितीन मोरे, कपिल गायकवाड,करण गायकवाड, आकाश सरवदे,वैभव गायकवाड, अतुल कदम तर सूत्रसंचालन रामदास सोनवणे यांनी केले.तर आभार शाम काळे यांनी मांडले.

## लाचखोरीचा गुजरात पॅटर्न, लाच देण्यासाठी सुरू केले ईएमआय सुविधा

गांधीनगर : मागच्या काही वर्षांमध्ये विकासाच्या गुजरात मॉडेलची खूप चर्चा झाली आहे. गुजरातमधील विकासाची जाहिरात त्या माध्यमातून देशभरात करण्यात आली. मात्र सध्या गुजरातमधील एक मॉडेल पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. मात्र हे मॉडेल विकासाचे नसून लाचखोरीचे आहे. भ्रष्ट सरकारी अधिका-यांनी लाचेची देवाण घेवाण करण्यासाठी एटक व्यवस्था लागू केली आहे. या माध्यमातून विविध कामांसाठी लाच देणा-यांना ईएमआयची सुविधा देण्यात येत आहे.



काही भ्रष्ट अधिकारी हे लाच घेण्यासाठी एटकची सुविधा देत आहेत, असं सांगितल्यास तुम्हाला आश्चर्याचा धक्का बसेल. मात्र सध्या गुजरातमध्ये लाचखोरीचं हे एटक मॉडेल खूप प्रचलित होत आहे. दरम्यान, गुजरातमध्ये यावर्षी एटक च्या माध्यमातून लाच घेण्याची १० प्रकरणे समोर आली आहे. गुजरातमधील काही भ्रष्ट सरकारी अधिका-यांनी लाच घेण्यासाठीचा हा हटके फॉर्म्युला अमलात आणला आहे. तसेच लाच देताना कुणावर आर्थिक भार पडू नये म्हणून ही लाच सुलभ हप्त्याने देण्याची सोय करण्यात आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे या सुविधेचा लाभ घेऊन लोक लाचही देत आहे. एसीबीने लाचखोरीच्या या प्रकाराची १० प्रकरणे समोर आणली आहेत.

याबाबत गुजरातमधील एसीबीच्या अधिका-यांनी सांगितले की, आतापर्यंत अशी १० प्रकरणे समोर आली आहेत. मार्च महिन्यात जीएसटीच्या एका बनावटी बिल घोटाळ्यामध्ये एका व्यक्तीकडे २१ लाख रुपयांची लाच मागण्यात आली होती. त्यामध्ये २ लाख रुपयांच्या १० हप्त्यांमध्ये लाच देण्याची सवलत देण्यात आली होती. त्यामुळे लाच देणा-यालाही फार झाला नसता. तसेच घेणा-या अधिका-यांनाही पूर्ण पैसे मिळाले असते. दरम्यान, या लाचखोरांनी एका शेतक-याकडेही मोठ्या रकमेच्या लाचेची मागणी केली होती. मात्र त्याची परिस्थिती पाहून त्याला हप्त्यांमध्ये लाच देण्याची सवलत दिली होती.

## संपादकीय....

# योगी आणि अखिलेश योग!

भाजपला उत्तर प्रदेशात तीनदा विजय मिळवून देणारे जातीय समीकरण मोडून काढण्यात सप आणि काँग्रेस यांना यश मिळेल, हे दिल्लीत कळलेच नसेल? भाजप लोकसभा निवडणुकीतील सलग तिसऱ्या विजयाचा सोहळा साजरा करत असला तरी, देशातील सर्वात मोठ्या राज्याने, उत्तर प्रदेशने सत्ताधारी पुरुषोत्तमांना जबरदस्त चपराक दिली आहे. उत्तर प्रदेश आपल्याला जणू आंदण मिळाल्याचा आव भाजपच्या नेत्यांनी आणला होता आणि ६२ जागा आहेतच, त्यात दहाची भर अगदी सहजपणे होऊ शकते असे त्या पक्षातील मंडळी छातीठोकपणे सांगत होती. हा आत्मविश्वास भाजपमध्ये मोदींमुळे आला होता की, योगींमुळे? तसे असेल तर विद्यमान पंतप्रधान आणि या पदासाठी इच्छुक या दोघांचेही नाक मतदारांनी कापले असेच म्हणावे लागते. अर्थात भाजपची पुरती कोंडी करण्याचे सगळे श्रेय समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांच्याकडे जाते. लोकसभा निवडणुकीत भाजपची बहुमताकडे होणारी वाटचाल रोखणारे अखिलेश हेच निर्विवाद 'सामनावीर' ठरतात.

उत्तर प्रदेशात भाजपने दोन विधानसभा आणि गेल्या लोकसभा निवडणुकीत यशस्वी केलेले बिगरयादव- बिगरजाटव जातीय समीकरण मोडून काढण्यात या वेळी समाजवादी पक्ष आणि यांना यश मिळेल अशी पाल भाजपच्या मनात चुकचुकली कशी नाही हेच आश्चर्य. भाजपचे शीर्षस्थ नेतृत्व सदासर्वकाळ निवडणुकीच्या पवित्र्यात असते. निदान तसे सांगितले जाते. मग तसे असेल तर इतकी मोठी चूक या वेळी भाजपच्या या नेतृत्वाने कशी काय केली? की विजयाचे श्रेय त्या राज्याचे मुख्यमंत्री यांस मिळू नये यासाठी पडद्यामागून झालेले उद्योग अंगाशी आले? केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तर उत्तर प्रदेश जिंकून देण्यात माहीर. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना थोडेसे बाजूला करून निवडणुकीची सगळी सूत्रे त्यांनी आपल्या हाती ठेवली आणि ती अन्य कोणी हलवणार नाही यासाठी चोख खबरदारी बाळगली. परिणामी योगी जितके 'दिसायला' हवे होते तितके दिसले नाहीत. त्यांच्या जोडीला बी. एल. संतोष यांच्यासारखे संघ–भाजपमधील नेतेही होते, असे म्हटले जाते. निवडणुकांच्या राजकारणात स्वत:ची उपयुक्तता सिद्ध न करणारे हे नेते उत्तर प्रदेश सांभाळणार असतील तर गंगेत डुबकी मारूनही 'पापक्षालन' होण्याची शक्यता नाही. या संतोष यांस आपली मातृभूमी कर्नाटक ही काँग्रेसच्या हाती जाण्यापासून वाचवता आली नाही. जनमानसात आधार असलेल्या नेत्यांपेक्षा या अशा दिवाणखानी राजकारण्यांना हाताशी धरले की असेच होते. अर्थात जे झाले त्यामुळे उत्तर प्रदेशातील भाजपचा दारुण पराभव योगींच्या पथ्यावर पडलेला असू शकतो हा भाग वेगळा! उमेदवारांच्या निवडीपासून प्रचाराच्या आखणीपर्यंत अनेक निर्णय योगींच्या पाठीमागे झाले असतील तर या पराभवाची जबाबदारी मोदी–शहा यांच्यावरच येऊन पडते. या दुकलीस योगी नकोच होते, असे म्हटले जाते. त्यांना मुख्यमंत्रीपदावरून दूर करण्याची वा त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याची इच्छा दिल्लीस अजूनही पूर्ण करता आलेली नाही. आता तर योगींविना उत्तर प्रदेश हातून जाण्याची भीती निर्माण झाली आहे. आम्हास आता संघाची गरज नाही म्हणणारे योगींवर मात करू शकत नाहीत, यापेक्षा केविलवाणा योगायोग तो कोणता?

विरोधकांवर मात करण्यासाठी मी एकटा पुरेसा आहे, अशी वल्गना करणाऱ्या आपल्या लोकप्रतिनिधीला गंगाकिनारी वसलेल्या वाराणसीने खडबडून जागे केले. इथली वास्तव परिस्थिती अखिलेश यादव आणि इंडिया आघाडीचे राजकीय चातुर्य दाखवून देते. २०१९ मध्ये वाराणसीमधून पंतप्रधान चार लाखांहून अधिक मताधिक्याने विजयी झाले होते. या वेळी त्यांचे मताधिक्य दीड लाखापर्यंत घरंगळत गेले. वाराणसीला जागतिक धार्मिक पर्यटनस्थळ बनवण्याची गर्वोक्ती केली जात होती. दक्षिण आणि उत्तर भारताचा संगम घडवून आणण्याचा अट्टहास झाला त्याच बनारसच्या मतदारांनी मोदींविरोधातील नाराजी मतदानातून व्यक्त केली असे म्हणणे चुकीचे कसे ठरेल? वाराणसीतून काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अजय राय हे मोदींविरोधात पुन्हा लढत होते. या मतदारसंघामध्ये हिंदूंचे ध्रुवीकरण भाजपच्या पथ्यावर पडते. गेल्या दोन निवडणुकांमध्ये मुस्लीम काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्ष यांच्यामध्ये विभागला गेला होता. दलित हे भाजप व 'बसप'कडे गेले होते. ओबीसी तर भाजपचा आधार. पण या वेळी भाजपचे हे जातींचे समीकरण केवळ वाराणसीमध्येच नव्हे; पूर्ण उत्तर प्रदेशात चुकले. मुस्लीम, दलित हे इंडिया आघाडीतील काँग्रेस–'सप'कडे सरकले होते. ओबीसींनीही भाजपपासून फारकत घेणे पसंत केले असे दिसते. अजय राय उच्चवर्णीय भूमिहार असून त्यांच्या जागी तगडा ओबीसी उमेदवार काँग्रेसने दिला असता तर मताधिक्याची वजाबाकी कुठेपर्यंत पोहोचली असती, अशा चर्चांना उधाण आले तर नवल काय? प्रभु रामचंद्रांची अयोध्या नगरी ज्या मतदारसंघामध्ये आहे त्या फैजाबादमध्ये भाजपच्या उमेदवाराला समाजवादी पक्षाच्या दलितांमधील पासी समाजातील उमेदवाराने धूळ चारली आहे. इथे रामदेखील भाजपच्या मदतीस आला नाही. भाजपचे जातीय समीकरणाचे फासे उलटे पडले ते असे.

दुसरीकडे केवळ मुस्लीम–यादव (एम–वाय) राज्यात सत्ता मिळवून देऊ शकत नाहीत याचे भान अखिलेश यांना २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपासून आले. दलित आणि यादवेतर ओबीसींना समाजवादी पक्षाशी जोडले नाही तर आपले राजकीय अस्तित्व धोक्यात येऊ शकते हा धोका अखिलेश यांनी अचूक ओळखला होता. देशभर मुस्लीम हे काँग्रेसकडे वळू लागले आहेत. मुस्लीम आधारही गेला तर काय करणार या विवंचनेने अखिलेश यांना काँग्रेसशी आघाडी करणे भाग पाडले असे म्हटले जाते. दोन वर्षांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत अखिलेश यांनी यादवेतर ओबीसी आणि दलितांना उमेदवारी देऊन 'एम–वाय'मध्ये सामावून घेण्याचा प्रयत्न केला होता. पण 'एम–वाय'च्या प्रभुत्वामुळे दलित आणि ओबीसी 'सप'च्या जवळ येत नव्हते. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत 'सप'च्या व्यापक जातीय समीकरणाच्या प्रयोगाला पूर्ण यश मिळाले नाहीच, उलटपक्षी दलित व यादवेतर ओबीसी मात्र भाजपकडे वळले होते. या वेळी अखिलेश यादव यांनी आपल्या घरातील चौघे वगळले तर यादव उमेदवार देणे टाळले. बहुतांश मतदारसंघांमध्ये यादवेतर ओबीसी आणि दलितांना उमेदवारी दिली. 'सप' हा फक्त मुस्लीम–यादवांचा पक्ष नाही हा संदेश पोहोचवण्यात अखिलेश यशस्वी ठरले. शिवाय, मुस्लीमबहुल मतदारसंघांमध्ये हिंदू उमेदवार देऊन भाजपसाठी लाभदायक ठरणारे धार्मिक ध्रुवीकरणही टाळले. त्यामुळे ३२ जागांचा फायदा होऊन 'सप' ३७ जागांवर पोहोचला, तर काँग्रेसच्या एकमेव जागेत पाचची भर पडली. त्यामुळे इंडिया आघाडी ४३ वर पोहोचली.

त्याच वेळी बेहेनजी मायावतींची 'विपश्यना' संपत नसल्याचे पाहून 'बसप'चे मुस्लीम आणि जाटवसह दलित मतदारांनी 'इंडिया' आघाडीच्या बाजूने दिलेला कौल ही मोठी जमेची बाजू ठरली. २०१९ मध्ये 'बसप'कडे १९ टक्के मते होती, ती या वेळी नऊ टक्क्यांवर आली. १० टक्के मते आणि १० जागाही मायावतींनी गमावल्या आहेत. इथे आता चंद्रशेखर आझाद–रावण यांच्या रूपाने नवे तरुण दलित नेतृत्व मायावतींची जागा घेण्याची शक्यता वाढली आहे. गेल्या वेळी गोरखपूर मतदारसंघातून योगींविरोधात विधानसभा निवडणूक लढवणाऱ्या आझादांनी अखेर निवडणुकीच्या राजकारणात यश मिळवलेच. नगीना या राखीव मतदारसंघातून ते विजयी झाले असून लोकसभेतील त्यांचा आक्रमक अवतार भाजपपुढे आव्हान निर्माण करेल हे निश्चित. उत्तर प्रदेशमध्ये जिंकण्याआधीच भाजपचे नेते विजयपताका मिरवत असताना अखिलेश यादव मात्र अत्यंत शांतपणे मतदारांचा पाया व्यापक करत गेले.

# आता पटनायकांची बारी!

प्रादेशिक पक्षांच्या सहकार्याने आपली नगण्य ताकद असलेल्या त्या राज्यात स्वत:चे अस्तित्व निर्माण करायचे, हळूहळू स्वत:साठी पूरक वातावरण तयार करून आपल्या पक्षाची ताकद वाढवत जायचे आणि नंतर ज्यांच्या सहकार्याने, मदतीने आपण उभे राहिलो त्या प्रादेशिक पक्षालाच आव्हान द्यायचे ही भाजपच्या अलीकडल्या काळातील राजकारणाची रीत बनली आहे. शिवसेना, अकाली दल यांसारख्या भाजपच्या कित्येक वर्षांपासून मित्रपक्ष राहिलेल्या प्रादेशिक पक्षांसह विविध राज्यांतील अनेक छोट्या–मोठ्या पक्षांना भाजपच्या या 'गरज सरो वैद्य मरो' या राजकारणाचा पुरेपूर अनुभव आलेला आहेच! अनेक प्रादेशिक पक्ष भाजपच्या या राजकारणाने राज्यातील आपली राजकीय ताकद व मतपेढी गमावून बसले तर काही पक्षांचे तर अस्तित्वच धोक्यात आले आहे. मात्र जगातला सर्वांत मोठा राजकीय पक्ष म्हणून मिरवणा–या भाजपची विस्ताराची भूक मात्र संपताना दिसत नाही. भाजपच्या याच राजकारणाच्या बळींच्या यादीत आता बिजू जनता दलाचे नवीन पटनायक यांचा समावेश होताना दिसतो आहे.



नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीसोबत चार राज्यांमधील विधानसभा निवडणुकाही पार पडल्या! त्यात भाजपला लोकसभा निवडणुकीत स्वबळावर सरकार स्थापन करता येईल, असे बहुमत न मिळाल्याने मोदी पर्वातील हे मोदींचे तिसरे सरकार हे मोदींचे वा भाजपाचे नव्हे तर रालोआचे सरकार असणार आहे. मात्र त्याच वेळी चार राज्यांतील विधानसभा निवडणुकीत भाजपने दोन राज्यांत स्वबळावर तर एका राज्यात मित्र पक्षासह सत्ता प्राप्त केली आहे. ज्या दोन राज्यांत भाजपला स्वबळावर सत्ता मिळाली त्यात अरुणाचल प्रदेश व ओडिशा या दोन राज्यांचा समावेश होतो. अरुणाचलमध्ये भाजपने सत्ता कायम ठेवण्याची कामगिरी केली मात्र ओडिशातील भाजपचा विजय मात्र लक्षणीय आहे. ओडिशात मागच्या अडीच दशकांपासून 'अजेय' मानल्या जाणा–या मुख्यमंत्री नवीन पटनायक व त्यांच्या बिजू जनता दलाला पूर्णपणे पराभूत करून भाजपने स्पष्ट बहुमत प्राप्त केले व पूर्व भारतात आपला झेंडा फडकाविला आहे.

वास्तविक या निवडणुकीपूर्वी भाजप व बिजू जनता दल यांच्यात युतीची बोलणी सुरू होती. तब्बल १७ दिवसांच्या जागा वाटपाच्या चर्चेनंतर ही बोलणी फिसकटली आणि भाजपने स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. १४७ सदस्यीय विधानसभेत ७८ जागा तर लोकसभेच्या २१ पैकी २० जागा जिंकून भाजपने या राज्यात निर्भेळ यश संपादन केले. शेजारच्या पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांनी भाजपचा विजय रथ रोखलेला असताना मागच्या २४ वर्षांपासून ओडिशात 'अजेय' राहिलेल्या नवीन पटनायक यांना मात्र दारुण पराभवाला सामोरे जावे लागले. त्या मागे पटनायक यांनी सातत्याने भाजपशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहकार्याची घेतलेली भूमिकाच शेवटी त्यांच्या अंगलट आल्याचे पाहायला मिळते. १९९७ ते २००८ या काळात बिजू जनता दल व भाजप हे ओडिशात मित्र पक्ष होते. सध्याच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू त्या काळात पटनायक सरकारमध्ये भाजपच्या वतीने मंत्री होत्या. ओडिशाच्या मागास भागात धर्मांतर मोठ्या प्रमाणात सुरू असल्याची ओरड सुरू झाल्यावर ते रोखण्यासाठी म्हणून बजरंग दल सक्रिय झाले.

याच दरम्यान ऑस्ट्रेलियन धर्मप्रचारक ग्रॅहम स्टेन्स व त्यांच्या दोन मुलांची जानेवारी १९९९ मध्ये जिवंत जाळून निर्घृण हत्या करण्यात आली. तेव्हापासून बजरंग दल, भाजप व रा. स्व. संघाने ओडिशात हातपाय पसरण्यास सुरुवात केली. २००८ मध्ये कंधमहल जिल्ह्यात हिंदू–ख्रिश्चन असा हिंसक संघर्ष झाला होता व त्यात ३० पेक्षा जास्त लोकांचा बळी गेला होता, हजारो लोक विस्थापित झाले होते. यानंतर नवीन पटनायक यांनी भाजपची 'थेट साथ' सोडण्याचा निर्णय घेतला. मात्र संसदेत व संसदेबाहेरही सातत्याने भाजपला अनुकूल व सहकार्याचीच भूमिका घेतली. संसदेत अनेक वेळा संख्याबळाने अडचणीत सापडलेल्या भाजपला पटनायक यांनी सहकार्य करून अडचणीतून बाहेर काढले. अगदी अलीकडे राज्यसभेच्या ३ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपकडे पुरेशी मते नसतानाही रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना निवडून आणण्यासाठी पटनायक यांनी भाजपला मदत केली होती. मात्र हीच प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष भाजपला सहकार्य करण्याची भूमिका आता पटनायक व त्यांच्या पक्षाच्या मुळावर उठली आहे.

भाजपने या वेळच्या निवडणुकीत बरोबर संधी साधून नवीन पटनायक व बिजू जनता दलाच्या मुळावर घाव घातला. विशेष म्हणजे हा घाव घालताना राष्ट्रीय पक्ष असणा–या भाजपने चक्क प्रादेशिक अस्मितेचा मुद्दा पुरता तापवून प्रादेशिक पक्ष असणा–या बिजू जनता दलास 'चेकमेट' केले! अलीकडे ७७ वर्षीय नवीन पटनायक यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे हिंडण्या–फिरण्यावर मर्यादा पडल्या होत्या. त्यांचे सचिव व सनदी अधिकारी व्ही. के. पंडियन हे प्रशासन व राजकारण अशा दुहेरी वर्तुळात महत्त्वाची भूमिका बजावत होते. स्वेच्छानिवृत्ती स्वीकारून पंडियन यांनी अधिकृतपणे बिजू जनता दलात प्रवेश केल्यावर पटनायक यांचे पक्षातील उत्तराधिकारी पंडियनच आहेत ही भावना पक्षात व जनतेतही दृढ होऊ लागली होती. पटनायक अविवाहित असल्याने व पंडियन यांचे पक्षातील स्थान बळकट होत असल्याने हा समज दिवसेंदिवस घट्ट होत चालला होता. पंडियन हे मूळचे तामिळी ! यामुळे ओडिशाची सूत्रे तामिळीच्या हाती देणार का? असा प्रादेशिक अस्मितेचा मुद्दा भाजपने चाणाक्षपणे उचलून धरला. मोदीपासून सर्वच भाजप नेत्यांनी प्रचारात हा मुद्दा प्रचंड तापविला. एवढेच नव्हे तर मोदी यांनी पटनायक यांच्या प्रकृती स्वास्थ्याबद्दल शंकाही उपस्थित केल्या.

प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात ही निवडणूक राज्यात याच मुद्यावर केंद्रित झाली तेव्हा पटनायक यांना आपली प्रकृती उत्तम असल्याचा व पंडियन आपले पक्षातले उत्तराधिकारी नसल्याचा खुलासा करावा लागला. मात्र तोवर खूप उशीर झाला होता व भाजपने आपला कार्यभाग साधला होता. त्यातून स्वत: पटनायक यांनाही निवडणुकीत पराभव चाखावा लागला व बिजू जनता दलाची २४ वर्षांची राज्यातील 'अजेय' सद्दी संपुष्टात आली. भाजपने या राज्यात निर्विवाद यश प्राप्त केल्याने पटनायक व त्यांच्या बिजू जनता दलासमोर आता अस्तित्वाचाच प्रश्न उपस्थित झाला आहे. थोडक्यात भाजपने वेळ येताच ज्याप्रमाणे शिवसेना, अकाली दल, भारत राष्ट्र समिती, आसाम गण परिषद, महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष, अण्णा द्रमुक आदी प्रादेशिक पक्षांना जागा दाखवून दिली. त्याचप्रमाणे आता पटनायक व त्यांच्या बिजू जनता दलालाही त्यांची जागा दाखवून देण्यास व 'अब की बारी..पटनायकांची बारी'! हे सिध्द करण्यास सुरुवात केली आहे. लोकसभा निवडणूक विजयाच्या दिल्लीतील जल्लोषात मोदी यांनी भाषणाची सुरुवात 'जय जगन्नाथ' अशी करणे हे त्याचेच द्योतक नाही काय?

# गरज फुटबॉलला प्रोत्साहनाची

भारतात फुटबॉलचा खेळ सुरू होऊन सुमारे १३० वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला असला तरी जागतिक पातळीवर अजूनही आपण चाचपडत खेळत आहोत. स्वातंत्र्याच्या अगोदर आणि नंतर आपल्या देशात फुटबॉलची स्थिती चांगली होती. १९५२ मध्ये आपण आशियायी क्रीडा स्पर्धेत विजय मिळवला होता. मात्र १९७० च्या दशकापासून आपली पीछेहाट होऊ लागली. अर्थात अजूनही अनेक प्रकारच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात, खेळाडूही येत आहेत, मात्र आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली पाटी कोरीच आहे. सरकार आणि अकादमीच्या पातळीवर दिल्या जाणा–या प्रोत्साहनाला कॉर्पोरेट जगाचे बळ मिळाले तर आगामी काळात प्रतिभावान फुटबॉलपटू निर्माण होण्यास वेळ लागणार नाही.

गाच्या पाठीवर प्राचीन काळापासून फुटबॉलसारखे खेळ अस्तित्वात आहेत, परंतु आधुनिक फुटबॉलचा उगम हा १९ व्या शतकात इंग्लंडमध्ये झाल्याचे मानले जाते. आधुनिक फुटबॉल हा मध्यकालीन खेळाचे बदललेले रूप होते. आज जगभरातील सर्वच देशांत फुटबॉल खेळला जातो आणि अमाप लोकप्रियता लाभलेला हा खेळ आहे. त्याचे महत्त्व ओळखून संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने दरवर्षी २५ मे हा जागतिक फुटबॉल दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आणि त्यानुसार तो साजरा केला जात आहे.

संयुक्त राष्ट्राचा निर्णय कौतुकास्पद असून त्यामुळे फुटबॉलची व्याप्ती वाढण्यास हातभार लागणार आहे. या खेळाला मिळणारी मान्यता आणि लोकप्रियता पाहता संयुक्त राष्ट्राच्या सर्वसाधारण सभेत लीबीयाने २५ मे बाबतचा प्रस्ताव मांडला. त्यास १६० हून अधिक देशांचे पाठबळ मिळाले आणि १९३ देशांनी त्यास पाठिंबा दिला. २५ मे हा जागतिक फुटबॉल दिवस निवडण्यामागचे कारण म्हणजे याच दिवशी शंभर वर्षांपूर्वी १९२४ मध्ये पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आयोजित फुटबॉल स्पर्धेत सर्वच देशांनी सहभाग घेतला. विशेष म्हणजे पॅरिसमध्येच १९०० मध्ये झालेल्या ऑलिम्पिकमध्ये फुटबॉलचा समावेश करण्यात आला. दीर्घकाळापर्यंत पुरुषाचा संघ यात खेळायचा. मात्र १९९६ च्या अटलांटा ऑलिम्पिकमध्ये महिला फुटबॉलचा समावेश झाला. 'फिफा'ची स्थापना १९०२ मध्ये झाली आणि कालांतराने ही संस्था जागतिक संघटना बनली. फिफाचे २११ सदस्य असून ही संख्या संयुक्त राष्ट्राच्या सदस्यांपेक्षा अधिक आहे.

आधुनिक फुटबॉलची अधिकृत पायाभरणी १८६३ मध्ये इंग्लंडमध्ये फुटबॉल असोसिएशनच्या रूपातून झाली आणि त्यात खेळाचे प्राथमिक नियम तयार करण्यात आले. याच काळात भारतासह जगातील अनेक देशांत ब्रिटिशांच्या वसाहती होत्या आणि त्यांची राजवट होती. साहजिकच इंग्रजांबरोबरच आधुनिक फुटबॉलने भारतासह अनेक देशांत शिरकाव केला आणि तो लोकप्रिय खेळ झाला. आपल्या देशात डुरंड कप ही सर्वांत जुनी स्पर्धा मानली जाते. आशिया खंडातील देखील सर्वांत जुनी स्पर्धा होय. पहिल्यांदा त्याचे आयोजन १८८८ मध्ये शिमल्यात करण्यात आले होते. जुन्या गोष्टीचा विचार केला तर जगातील पाचव्या क्रमांकाची सर्वांत जुनी राष्ट्रीय स्पर्धा म्हणून त्याकडे पाहिले जाते. या स्पर्धेचे जनक ब्रिटिश राजनैतिक अधिकारी सर हेन्री मोर्टिमर डुरंड होते. अर्थात फुटबॉलला बळकटी कोलकाता येथून मिळाली आणि तीच भारतातील फुटबॉलची राजधानी म्हणून ओळखली गेली. कोलकाता इंग्रजांची देखील राजधानी होती. कोलकाता येथे मोहन बागान, ईस्ट बंगला, मोहमेडन स्पोर्टिंग यासारखे क्लब सुरू झाले आणि तेथून नामांकित मोठमोठे खेळाडू बाहेर पडले.


आज लहान–मोठ्या फुटबॉल क्लबच्या आणि अकादमींच्या संख्येचा विचार केल्यास ती ५० हजारांपेक्षा अधिक आहे. जुन्या खेळाडूंत पी. के. बॅनर्जी, अरुण घोष, सेलेन मन्ना, तुलसीदास बलराम, मोहंमद सलीम, पीटर थंगराज, मेवालाल, करीम, जर्नल सिंह यांसारख्या नावांचा उल्लेख करता येईल. नवीन पिढीतील खेळाडूंत सुनील छेत्री, सुब्रत पाल, वायचुंग भुतिया, लालपेखलुआ, गुरप्रीत संधू, संदेश झिंगन, तेलम सिंह, धीरज सिंह, प्रणय हलदर, कुमाम सिंह, आशिक कुरुनिया यांनी आपल्या खेळाच्या कौशल्यावर लोकप्रियता मिळवली. सुनील छेत्रीने तर भारताकडून सर्वाधिक गोल करण्याचा विक्रम केला आहे. स्वातंत्र्याच्या अगोदर आणि नंतर आपल्या देशात फुटबॉलची स्थिती चांगली होती आणि आपला राष्ट्रीय संघही आंतरराष्ट्रीय पातळीवर छाप पाडणारा होता. १९५२ मध्ये आपण आशियायी क्रीडा स्पर्धेत विजय मिळवला होता. देशात अनेक स्पर्धांचे आयोजन केले जाते, देशभरात अनेक प्रतिभावान खेळाडू उदयास येतात. मात्र १९७० च्या दशकापासून आपली पीछेहाट होऊ लागली. अर्थात अजूनही अनेक प्रकारच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात, खेळाडूही येत आहेत, मात्र आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली पाटी कोरीच आहे.



ऑलिम्पिकमध्ये सहभागी होत नसल्याने आणि जागतिक करंडक पात्रता फेरीतच गारद होत असल्याने आपले मनोधैर्य आणि आत्मविश्वास खचलेला आहे. त्याचवेळी क्रिकेटमध्ये विश्वचषक जिंकल्याने आणि सतत यश मिळाल्याने त्याची लोकप्रियता वाढत गेली अणि तरुणांचा कल क्रिकेटकडे वळला. फुटबॉलच्या बाबतीत जे घडले, तेच हॉकीतही घडले. त्यातही आपण मागे पडू लागलो. वास्तविक हॉकीमध्ये एकेकाळी भारताने हुकुमत गाजवली आहे. गेल्या चार दशकांपासून ऑलिम्पिकच्या सुवर्णपदकांपासून वंचित आहोत. अर्थात फुटबॉलच नाही तर अनेक खेळांतही जागतिक पातळीवर चांगली कामगिरी करण्याची क्षमता भारतीय खेळाडूंत आहे आणि ती काही प्रमाणात दिसतही आहे.

मात्र फुटबॉलच्या मैदानात आपल्याला कामगिरी करायची असेल तर नियोजनबद्ध रीतीने आणि व्यापक पातळीवर प्रयत्न करावे लागतील. वास्तविक देशात फुटबॉल क्लब आणि अकादमींची संख्या लक्षणीय आहे. परंतु त्यांना संघटित करणे आणि परस्पर सहकार्य वाढविण्यावर लक्ष देणे गरजेचे आहे. जिल्हा आणि राज्य पातळीवर अकादमींची स्थापना करणे गरजेचे आहे. जेणेकरून नव्या प्रतिभावान खेळाडूंना प्रोत्साहन मिळेल आणि त्यांना योग्य मार्गदर्शन मिळेल. निवृत्त झालेल्या फुटबॉलपटूंची मदतही याकामी घ्यायला हवी. त्यांचा अनुभव आणि कौशल्याचा लाभ नव्या पिढीला मिळवून देण्याचे प्रयत्न व्हायला हवेत. त्यांच्या भेटीगाठी घडवून आणणे फायद्याचे ठरू शकते. फुटबॉलच्या विकासात एक सर्वांत मोठे आव्हान म्हणजे प्रशिक्षकाचा अभाव. यावरही लक्ष देणे गरजेचे आहे. आपल्या देशातील सर्व खेळांत पैसा आला असेल, लोकप्रियता वाढली असेल तरीही खेळ संस्कृतीचा अभाव आहे. यासाठी मैदानाची संख्या पुरेशी असणे अपेक्षित आहे.

# खूप हसल्यामुळे हैदराबादमध्ये एक व्यक्ती बेशुद्ध; पण हे कसे शक्य? तज्ज्ञांनी केला खुलासा



हसणे हे सर्वोत्कृष्ट औषध आहे हे आपण सर्वांनी ऐकले आहे; परंतु एका व्यक्तीला मनापासून खळखळून हसणे महागात पडले आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म (पूर्वीचे ट्विटर)वर न्यूरोलॉजिस्ट डॉ. सुधीर कुमार यांनी त्यांच्या या पेशंटबाबत माहिती दिली. खूप हसण्यामुळे श्याम (नाव बदलले आहे) हे बेशुद्ध झाले होते.

'चहा आणि कॉमेडी शो'चा आनंद लुटताना श्याम यांना खूप हसू येत होते; जे त्यांना रोखता येत नव्हते. ते इतके हसले की, शेवटी त्यांनी आपल्या चहाच्या कपावरील नियंत्रण गमावले आणि नंतर त्यांचे शरीर शक्तीहीन झाले. सुरुवातीला ते खुर्चीवरून पडले आणि थोड्या वेळासाठी त्यांची शुद्ध हरपली. सुदैवाने, त्यांना त्वरित वैद्यकीय मदत मिळाली. डॉ. कुमार यांनी त्यांच्या स्थितीचे निदान हास्य-प्रेरित सिंकोप म्हणून करण्यात आले. ही एक दुर्मीळ; परंतु वास्तविक घटना आहे.

याबाबत सहमती दर्शवीत हैदराबाद, बंजारा हिल्स केअर हॉस्पिटल्स, इंटर्नल मेडिसिनचे सल्लागार डॉ. अथर पाशा यांनी दी इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना सांगितले, जास्त हसण्यामुळे शुद्ध हरपणे अत्यंत दुर्मीळ गोष्ट आहे; परंतु परिस्थितीमुळे ते शक्य आहे.

हास्य-प्रेरित सिंकोप म्हणजे काय? हृदयाच्या गतीमध्ये अचानक चढ-उतार आणि रक्तदाब कमी झाल्यामुळे असे होते; ज्यामुळे शुद्ध हरपते, असे डॉ. पाशा यांनी स्पष्ट केले. हे सहसा काही प्रकारच्या तणावपूर्ण स्थितीची प्रतिक्रिया म्हणून होते. अत्याधिक हसण्यामुळे चेतना नष्ट होण्याद्वारे ही अत्यंत दुर्मीळ स्थिती उदभवू शकते.

वासोवागल, कार्डियाक, सिच्युएशनल व न्यूरोलॉजिक सिंकोप हे काही प्रकारचे सिंकोप आहेत; जे हास्य-प्रेरित सिंकोपसारखे आहेत, असेही त्यांनी सांगितले.

काही लोकांना इतरांपेक्षा जास्त धोका आहे का?

हास्य-प्रेरित सिंकोपशी संबंधित विशिष्ट धोका वाढविणाऱ्या घटकांवरील संशोधन मर्यादित प्रमाणात झाले आहे. या संशोधनात असे सुचवले जाते की, अचानक मृत्यू, छातीत दुखणे किंवा धडधडणे यांचा कौटुंबिक इतिहास असलेल्या व्यक्तींना सिंकोपचा धोका जास्त असतो आणि त्यामुळे हास्य-प्रेरित सिंकोपचाही धोका जास्त असतो. या विकारावर प्रतिबंध आणि रुग्णाच्या समस्येबद्दल जागरूकता याद्वारे उपचार केले जातात, असे डॉ. पाशा यांनी स्पष्ट केले.

त्यावर उपचार केले जाऊ शकतात किंवा फक्त नियंत्रित केले जाऊ शकतात?

हास्य-प्रेरित सिंकोपसाठी कोणताही विशिष्ट उपचार नाही; पण काही नियंत्रण धोरणे अवलंबल्यास ते ही परिस्थिती टाळण्यावर लक्ष केंद्रित करू शकतात. उदा. जोरजोरात हसण्यामुळे सिंकोपचा त्रास होऊ शकतो. त्यामध्ये जीवनशैलीतील बदलांचा समावेश असू शकतो; जसे की खूप हसविणाऱ्या परिस्थिती किंवा गोष्टी टाळणे. विशेषतः जर भूतकाळात सिंकोपचे प्रसंग आले असतील, तर आवर्जून अशा गोष्टी टाळाव्यात.

# ही ७ योगासने शरीराला रबराप्रमाणे लवचिक बनवतील, टिप्स जाणून घ्या

आजकाल प्रत्येकाला तंदुरुस्त आणि लवचिक शरीर हवे असते. पण दिवसभराच्या धकाधकीनें शरीर कडक होते, स्नायू घट्ट होतात आणि लवचिकता कमी होते. तुम्हालाही तुमचे शरीर रबरासारखे लवचिक बनवायचे असेल आणि स्नायू घट्ट होण्यापासून रोखायचे असतील, तर तुमच्यासाठी योग हा एक उत्तम पर्याय आहे.ही योगासने तुमचे शरीर लवचिक बनवतील:

१. सूर्यनमस्कार: सूर्यनमस्कार हे एक योगासन आहे जे संपूर्ण शरीराला लवचिक बनवते. या आसनामुळे सर्व स्नायू ताणले जातात आणि ते मजबूत होतात.

२. त्रिकोनासन: त्रिकोनासन पाय, नितंब आणि पाठीचे स्नायू लवचिक बनवते. या आसनामुळे शरीरातील रक्ताभिसरण सुधारते.

३. उत्तानासन: उत्तानासन पाठीच्या स्नायूंना ताणते आणि त्यांना लवचिक बनवते. हे आसन तणाव आणि थकवा दूर करण्यास मदत करते.

४. पश्चिमोत्तनासन: पश्चिमोत्तनासनामुळे पाठ, मांड्या आणि पाय यांचे स्नायू लवचिक होतात. या आसनामुळे पचनक्रिया सुधारते.

५. भुजंगासन: भुजंगासन पाठीच्या स्नायूंना बळकट करते आणि त्यांना लवचिक बनवते. या आसनामुळे पचनक्रिया सुधारते.

६. धनुरासन: धनुरासनामुळे पाठीचे, नितंबांचे आणि पायांचे स्नायू लवचिक होतात. या आसनामुळे शरीरात लवचिकता आणि संतुलन येते.



७. शवासन: शवासन एक विश्रांतीची मुद्रा आहे जी तणाव आणि थकवा दूर करते. हे आसन शरीराला आराम देते आणि स्नायूंना आराम करण्यास मदत करते. ही योगासने करण्यासाठी काही टिप्स: योगासने करण्यापूर्वी शरीराला गरम करा. योगासने हळू आणि काळजीपूर्वक करा. आपल्या शरीराच्या मर्यादा लक्षात ठेवा. जर तुम्हाला काही दुखापत झाली असेल तर योग करण्यापूर्वी तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या. नियमित योगासने केल्याने तुमचे शरीर रबरासारखे लवचिक होईल, स्नायू घट्ट होणार नाहीत आणि तुम्ही निरोगी आणि तंदुरुस्त राहाल. योगासनामुळे शरीर लवचिक तर होतेच, पण त्यामुळे मन शांत होते आणि तणावही दूर होतो. त्यामुळे आजपासूनच योगासने सुरू करा

# आरोग्यासाठी क्रॅनबेरीज चांगल्या की आपली देशी करवंदे? आहारतज्ज्ञ काय सांगतात? वाचा

उन्हाळा सुरू झाला की, अनेक हंगामी फळं बाजारात उपलब्ध होतात. विशेषत: आंबा, फणस यांबरोबर अनेक परदेशी फळांनाही मोठी मागणी असते. त्यात क्रॅनबेरी हे फळ उन्हाळ्यात अनेक जण आवडीने खातात. शरीरासाठी पोषक असलेल्या फळाचे खूप फायदे आहेत. पण, तुम्ही क्रॅनब्रेरीप्रमाणेच दिसणारी काळ्या रंगाची करवंदे कधी खाल्ली आहेत का? खेड्यापाड्यांत मोठ्या प्रमाणात मिळणारी ही रानटी करवंदे चवीला तर भारीच; पण पौष्टिक मूल्यांच्या बाबतीतही गुणकारी आहेत. त्यामुळे क्रॅनबेरीला रानातील करवंदेहा चांगला पर्याय असू शकतो.



याच विषयावर दी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना मुंबईतील सर एचएन रिलायन्स फाऊंडेशन हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ वेदिका प्रेमानी यांनी सविस्तर माहिती दिली आहे. त्यात त्यांनी क्रॅनबेरी की करवंद यापैकी आपल्या शरीरासाठी कोणते फळ उपयुक्त ठरू शकते हे सांगितले आहे.

करवंद करवंद ज्याला काळे मनुके, असेही म्हटले जाते. भारतातातील उष्ण कटिबंधीय प्रदेशात उगवणारे हे फळ आहे. या फळापासून लोणचे, जाम, डिप्स आणि इतर अनेक गोड, आंबट पदार्थ बनवले जातात. पण, चवीपलीकडे त्यात अनेक पौष्टिक गुणधर्म आहेत; जे आपल्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरतात.

१) क जीवनसत्त्व करवदांमध्ये क जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असते. त्यामुळे रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यासह विविध आजारांपासून संरक्षण करण्यासाठी मदत होते.

२) आतड्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर करवंदामध्ये फायबरचे प्रमाण अधिक असते; ज्यामुळे पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. आतड्यांची हालचाल नियंत्रित करता येते आणि एकूणच आतड्यांच्या आरोग्यास प्रोत्साहन मिळते.

३) अँटिऑक्सिडंट घटक अँथोसायनिन्स फ्लेव्होनॉइड्सने समृद्ध करवंद ऑक्सिडेटिव्ह तणावाशी लढण्यास मदत करते. त्वचेचे आरोग्य निरोगी ठेवते. तसेच हृदयरोग आणि टाईप-२ मधुमेह यांसारख्या जुनाट आजारांचा धोका कमी करते.

४) अत्यावश्यक जीवनसत्त्वे आणि खनिजे करवंदामध्ये जीवनसत्त्व अ, ब, कॅल्शियम, फॉस्फरस व लोहाचे प्रमाण अधिक असते; ज्यामुळे डोळे आणि हाडांचे आरोग्य सुधारते. त्याशिवाय चयापचय आणि शारीरिक क्रिया सुधारण्यास मदत होते.करवंद की क्रॅनबेरी, यात आरोग्यासाठी कोणते फळ चांगले? क्रॅनबेरी आणि करवंद या दोन्ही फळांचा रंग वेगवेगळा असला तरी ही दोन्ही फळे आकार आणि चव या बाबतीत काही प्रमाणात एकसारखीच आहेत. त्यामुळे त्यांची वारंवार परस्परांशी तुलना केली जाते. याच गोष्टीवर आहारतज्ज्ञ प्रेमानी यांनी काही प्रमुख फरक सांगितले आहेत.

१) पौष्टिक घटक करवंद आणि क्रॅनबेरी या दोन्हीमध्ये क जीवनसत्त्व भरपूर असते. पण, करवंदांमध्ये याचे प्रमाण थोडे जास्त असते. क्रॅनबेरीमध्ये कॅलरी आणि कार्बोहायड्रेटचे प्रमाण कमी असते.

२) चव करवंदे काही वेळा गोड आणि काही वेळा तितकीच आंबट असतात; पण क्रॅनबेरी खूप आंबट असतात.

३) किंमत आणि उपलब्धता भारतात करवंद हे स्थानिक आणि हंगामी फळ आहे. त्यामुळे ते आयात केलेल्या क्रॅनबेरीपेक्षा स्वस्त असते.

करवंदे खाण्याचे 'हे' फायदे तुम्हाला माहितेयत का?

आहारतज्ज्ञ प्रेमानी यांनी करवंदांचा आहारात समावेश करण्याच्या फायद्याविषयी सांगितले आहे.

१) अधिक पौष्टिक परदेशातून आयात होऊन येणाऱ्या फळांच्या तुलनेत स्थानिक हंगामी फळांमध्ये अधिक पौष्टिक घटक असतात.

२) पीक, फ्लेवर आणि पोषण स्थानिक पातळीवर उगवलेली फळे चांगल्या प्रकारे परिपक्व झाल्यावर काढली जातात. त्यामुळे त्यांची चव आणि त्यातील पौष्टिक मूल्ये जास्तीत जास्त वाढतात.

३) स्थानिक अर्थव्यवस्थेला सहायक स्थानिक फळांची निवड केल्यास स्थानिक शेतकऱ्यांना त्याचा फायदा होतो आणि वाहतुकीशी संबंधित कार्बन फूटप्रिंट कमी होतो.

४) आतड्यांच्या आरोग्याला चालना करवंदांसारख्या ताज्या, कमीत कमी प्रक्रिया केलेल्या फळांमध्ये भरपूर प्रमाणात पोषक घटक असतात. त्यामुळे तुमच्या आतड्यांच्या मायक्रोबायोममध्ये विविधता आणण्यास मदत होते. अशाने तुमची पचनसंस्था मजबूत होते.

करवंद आणि क्रॅनबेरी या दोन्ही फळांमध्ये अनेक पोषक घटक असतात. पण आहारतज्ज्ञ प्रेमानी यांच्या मते, कोणत्याही फळाची निवड ही तुमच्या वैयक्तिक प्राधान्य आणि आहाराच्या गरजांवर अवलंबून असते. तुम्ही स्थानिक पातळीवर उपलब्ध, किफायतशीर व क जीवनसत्त्वयुक्त आंबट असलेले फळ शोधत असाल, तर करवंद तुमच्यासाठी बेस्ट आहे. पण जर तुम्ही अधिक आंबट चव पसंत करीत असाल आणि त्याची किंमत अधिक असली तरी त्याबद्दल काही हरकत नसेल, तर क्रॅनबेरी अजूनही एक निरोगी पर्याय असू शकतो. पण, एक गोष्ट लक्षात ठेवा- आपल्या आहारात विविध फळांचा समावेश करणे हे जास्तीत जास्त फायदे

# फणसाच्या सेवन नंतर चुकूनही खाऊ नका हे पदार्थ

फणस आरोग्यासाठी फायदेशीर असते. पण फणसाची भाजी खाल्यानंतर काही वस्तू खाऊ नये. यामुळे शरीराला नुकसान होऊ शकते. जाणून घ्या फणस खाल्यानंतर काय खाऊ नये.



उन्हाळ्याचे दिवस सुरु आहेत. डायबिटीज पासून तर ब्लड प्रेशरच्या लोकांसाठी फणस खूप आरोग्यदायी असते. जेवणात फणसाची भाजी जेवणाचा स्वाद वाढवते. फणसामध्ये फाइबर, विटामिन ए, विटामिन सी, विटामिन बी, पोटॅशियम, कार्बोहाइड्रेट, जिंक आणि कॅल्शियम भरपूर प्रमाणात असते. हे सारे पोषक तत्व रोगप्रतिकात्मक शक्ती वाढवण्यास मदत करतात. तसेच फणस खाल्यानंतर काही वस्तूंचे सेवन करू नये.

१. दूध-जर तुम्ही फणसाची भाजी खात असाल तर दुधापासून बनलेले कोणतेही पदार्थ खाऊ नका. फणस आणि दूध एकत्रित सेवन नेल्यास त्वचा विकार होऊ शकतात.

२. मध-मध आणि फणस एकत्रित खाणे आरोग्यासाठी घातक असतात. जर तुम्ही फणसाची भाजी खाल्ल्यानंतर मध युक्त पदार्थ खात असाल तर ब्लड शुगर अनियंत्रित होऊ शकते.

३. भेंडी- काही ओक फणसाची भाजी सोबत भेंडीची भाजी खातात जे आरोग्यासाठी चांगले नाही. हे कॉंबिनेशन त्वचेवर डाग निर्माण करू शकतात.

४. पपई-जर तुम्ही फणसाची भाजी खाल्यानंतर पपई खात असाल तर असे करू नये. ज्यामुळे शरीरामध्ये सूज निर्माण होऊ शकते.

५. पान-जर तुम्हाला जेवण झाल्यानंतर पण खाण्याची सवय असले. जर तुम्ही फणसाची भाजी खाल्ली असेल तर पान खाऊ नका. यामुळे तुम्हाला पोटाच्या समस्या निर्माण होऊ शकतात.

# अंगठी चोर : तेनालीरामची रंजक कहाणी



महाराज कृष्णदेव राय हे मौल्यवान रत्नजडित अंगठी घालायचे. जेव्हा पण ते कधी राज्यसभेत यायचे त्यांची नजर आपल्या मौल्यवान अंगठीवर असायची. ते आपल्या राजमहालाच्या प्रत्येका जवळ आपल्या अंगठी बद्दल संभाषण करत होते. एकदा राजा कृष्ण देव उदास होऊन आपल्या सिंहासनावर बसले होते. तेनालीने त्यांना त्यांच्या उदास असण्याचे कारण विचारले तेव्हा त्यांनी माझी अंगठी गहाळ झाल्याचे सांगितले आणि त्यांना संशय आहे की त्यांच्या १२ अंगरक्षकांपैकीच कोणी चोरली आहे. राजा कृष्णदेव यांच्या अवती भोवती त्यांच्या सुरक्षेचा काटे कोर बंदोबस्त असायचा की कोणी सामान्य माणूस देखील त्यांच्या जवळ येऊ शकतं नव्हता.

तेनालीरामाने महाराजांना आश्वस्त केले की महाराज मी चोराला लवकरच आपल्या समोर आणेन. हे ऐकतातच महाराज आनंदी झाले त्यांनी आपल्या सर्व पहारेकरी आणि अंगरक्षकांना बोलाविले. तेनाली म्हणाले की महाराज आपली अंगठी या १२ अंगरक्षकांपैकीच कोणा एकानेच चोरली आहे आणि मी त्या चोराला शोधून काढेन. जो खरा आहे त्याला घाबरण्याची काहीच गरज नाही पण जो दोषी आहे त्याला शिक्षा मिळेलच त्यानी शिक्षा भोगण्यासाठी तयार व्हावं.


तेनालीरामाने त्यांना सांगितले की आपण सगळे माझ्या बरोबर चला आपल्याला देवीच्या देऊळात जायचे आहे.

महाराज म्हणाले 'अरे हे काय तेनाली आपल्याला तर चोराचा सुगावा लावायचा आहे तर देऊळात दर्शन करायला का जायचे ? महाराज आपण काळजी करू नका लवकरच चोर आपल्या समोर असेल आपण धीर ठेवा. 'असे म्हणून तेनाली देऊळाच्या पुजाऱ्याकडे गेले आणि त्यांना काही सूचना दिल्या. नंतर त्यांनी त्या अंगरक्षकांना सांगितले की तुम्हाला पाळी-पाळीने देऊळात जाऊन देवी आईच्या पायाला हात लावून लगेचच बाहेर पडायचे आहे. असं केल्याने देवी आई मला आज रात्री त्या चोरांचे नाव स्वप्नात येऊन सांगेल.

सर्व अंगरक्षक पाळी-पाळीने जाऊन देवी आईच्या पाया पडून बाहेर पडले. जसे अंगरक्षक बाहेर यायचे तेनालीराम जाऊन त्यांच्या हाताचा वास घ्यायचे आणि एका रांगेत उभे राहायला सांगायचे. महाराज म्हणाले की 'आता चोराचा शोध तर सकाळीच लागेल कारण देवी आई आज तुला दृष्टांत देईल' तो पर्यंत ह्यांचे काय करावे ?' नाही महाराज चोराचा शोध लागला आहे आणि सातव्या नंबरचा अंगरक्षकच चोर आहे. हे ऐकतातच अंगरक्षक पळू लागला तिथे उभे असलेले शिपायांनी त्याला धरले आणि तुरुंगात टाकले.

राजा आणि सर्व जण आश्चर्यात पडले की अखेर चोराला तेनालीरामाने शोधले कसे आणि त्याला स्वप्न न पडतातच कसे कळाले की हाच चोर आहे.तेनालीरामाने सर्वांची जिज्ञासा शांत करीत सांगितले की महाराज मी पुजाऱ्यांना देवी आईच्या मूर्तीच्या पायाला अत्तर लावायला सांगितले होते ज्यामुळे ज्याने देवी आईचा पायाला हात लावला तर त्याच्या हाताला अत्तराचा सुवास लागला. पण जेव्हा मी या अंगरक्षकाच्या हाताचा वास घेतला तेव्हा त्याच्या हाताला वास लागला नाही कारण त्याच्या मनात भीती होती आणि त्या वरून हाच चोर आहे हे कळले 'राजा कृष्णदेव राय ने तेनालीरामाच्या बुद्धिमत्तेची प्रशंसा केली आणि स्वर्ण मुद्रांनी त्यांना सन्मानित केले.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा सुरुळीत



मुरुड / महेंद्र आल्टे : येथील संभाजी महाविद्यालयात दि.२४ मे पासून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या उन्हाळी २०२४ च्या परीक्षा सुरुळीतपणे आणि कॉपीमुक्त वातावरणात सुरु आहेत. बी. ए., बी. कॉम., एम.ए., अभ्यासक्रमाचे विद्यार्थी परीक्षा देत आहेत. परीक्षाकेंद्रावर जवळपास आठशे विद्यार्थी सकाळ व दुपार सत्रात परीक्षा देत आहेत. सदरील परीक्षा महाविद्यालयाचे प्राचार्य व केंद्रप्रमुख डॉ. ए. डी. काळम आणि केंद्र संयोजक प्रा. डॉ.एम. एस. बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहेत. सदरील परीक्षेसाठी बाह्यपरीक्षक म्हणून प्रा.डॉ. शिवशंकर कसबे, अंतर्गत परीक्षक म्हणून प्रा. शैलेंद्र सुतार तर केंद्र सहाय्यक म्हणून श्री.भरतेश मांडवकर तसेच श्री.बंकट घुटे, श्री. सुनील गाडे, श्री.अरुण सवासे, श्री. बालाजी देशमुख हे देखील परीक्षा सुरुळीत आणि यशस्वी संपन्न करण्यासाठी सहकार्य करत आहेत.

# स्वराज्य हितासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी धर्मनिरपेक्ष आणि विज्ञानवादी धोरणाचा अवलंब केला. इतिहास विभागप्रमुख डॉ. सदाशिव दंदे




लातूर :- इ. स. सन ६ जून सोळाशे १६७४ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांनी पारतंत्र्यातली जनता किंवा राज्य हे स्वातंत्र्यात आणले आणि त्याचा रायगडावर स्वतः राज्याभिषेक केला त्यांनी संपूर्ण राज्यकारभारामध्ये जनतेच्या स्वराज्य हितासाठी धर्मनिरपेक्ष आणि विज्ञानवादी धोरणाचा अवलंब केला आणि त्यामुळेच स्वराज्याचे रूपांतर सुराज्यात झाले असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख तथा इतिहास अभ्यासक डॉ. सदाशिव दंदे यांनी बोलताना व्यक्त केले. श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि महात्मा बसवेश्वर महाविद्यालय इतिहास विभाग, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळा प्राचार्य कक्षामध्ये साजरा करण्यात आला. यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, प्रा. काशिनाथ पवार आणि प्रा. केशव बिरादार यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. सदाशिव दंदे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी आपला राज्यकारभार करीत असताना अठरापगड जातीला एकत्र करून स्वराज्याचे रूपांतर सुराज्यात केले आणि केवळ समाज हीत जोपासुनच संपूर्ण आयुष्यभर त्यांनी समाजासाठी कार्य केले. त्यांच्या राज्यकारभाराचा आदर्श आजचे राज्यकर्ते आणि प्रशासकांनी घ्यावा, असेही ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक नामदेव बेंदरगे यांनी केले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, आज छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक सोहळा रायगडावर संपन्न होत आहे. या रायगडावर आपल्या लातूर येथील कलाधिराज ढोलपथकाच्या माध्यमातून महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व होत आहे याचा मनस्वी आनंद आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी व्यक्तिगत स्वार्थापेक्षा समाजहित आणि सामाजिकता संपूर्ण आयुष्यामध्ये जतन केली. आपल्या कृतीशील व्यक्तिमत्त्वामुळे त्यांच्या राजकारभाराचा आपल्याला आदर्श दिसून येतो. त्यांनी दिलेल्या विचाराची प्रत्यक्ष कृती व्यवहारात व्हावी असा आशावादही त्यांनी यावेळी व्यक्त केला. या कार्यक्रमाला विनायक लोमटे, रत्नेश्वर स्वामी, विरसन उटगे, यशपाल ढोरमारे, महादेव स्वामी, योगेश मोदी, अनिल उस्तुरगे, शुभम बिराजदार, श्रीशैल्य पाटील, राम पाटील, योगीराज माकने, आनंद खोपे आणि अशोक शिंदे यांची उपस्थिती होती.

# राजस्थानी मल्टीस्टेट को ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेड परळी शाखा लातूर शाखेत गुंतवणूक केलेल्या ठेवी न मिळालेल्या ठेवीदारांनी आर्थिक गुन्हे शाखा लातूर येथे विना विलंब कळविणे .

लातूर :- राजस्थानी मल्टीस्टेट को ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेड परळी शाखा लातूर शाखेत गुंतवणूक केलेल्या ठेवी न मिळालेल्या ठेवीदारांनी आर्थिक गुन्हे शाखा लातूर येथे विना विलंब कळविणे . याबाबत थेडक्यात माहीती अशी की, मागील महिन्यात पोलीस ठाणे गांधी चौक लातूर येथे गुन्हा रजि. नं.२३४/२०२४ कलम ४०६,४२०,४०९,३४ भा.दं.वि. सह कलम ३ एम पी आय डी ॲक्ट प्रमाणे राजस्थानी मल्टीस्टेट को ऑप क्रेडिट सोसायटी लि.परळी शाखा लातूर येथील चेअरमन, संचालक मंडळ, स्थानिक सल्लागार व पदाधिकारी यांचे विरुद्ध गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा पोलीस अधीक्षक कार्यालय लातूर या ठिकाणी चालू आहे.

सदर गुन्ह्यातील तक्रारदार एडवोकेट नंदकिशोर रामनिवास अग्रवाल यांच्यासह ४३ ठेविदारांनांची फसवणूक केल्या बाबत माहिती प्राप्त झालेली आहे. सदर प्रकरणाच्या तपासात लातूर जिल्ह्यातील राजस्थानी मल्टीस्टेट को. क्रेडिट सोसायटीमध्ये गुंतवणूक केलेल्या ठेवीदारांची माहिती एकत्रित करण्याची प्रक्रिया चालू आहे . सदर प्रक्रिये दरम्यान ठेवीदारांच्या वित्तीय संस्थेतील हितसंबंधाचे संरक्षण करण्याच्या हेतूने कोणताही ठेवीदार वंचित राहणार नाही. यासाठी सर्व फसवणूक ठेवीदार यांची तपासात माहिती उपलब्ध होणे गरजेचे आहे. तरी राजस्थानी मल्टीस्टेट सोसायटी मधील ठेवीदारांनी त्यांच्या ठेवी परत न मिळाल्यास त्याची माहिती विना विलंब आर्थिक गुन्हे शाखा येथे संपर्क करण्याचे आवाहन लातूर पोलीस दलाकडून करण्यात येत आहे. संपर्काचा पत्ता - पोलीस निरीक्षक यांचे कार्यालय आर्थिक गुन्हे शाखा पोलीस अधीक्षक कार्यालय अंबाजोगाई रोड लातूर

# केंद्रात एनडीए सरकार येताच, महाराष्ट्रात राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार

नवी दिल्ली, : लोकसभा निवडणुकीत महायुतीला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. त्यामुळे हा पराभव विसरून आगामी विधानसभा निवडणुकीसाठी जोमाने कामाला लागण्याच्या उद्देशाने केंद्रात एनडीएचे सरकार स्थापन झाल्यानंतर काही दिवसांतच राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

एनडीएच्या बुधवारी झालेल्या बैठकीनंतर नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातील नेत्यांशी संवाद साधून पराभवाची कारणे जाणून घेतली. राज्यात मराठा आरक्षणासह उमेदवारी वाटपातील घोळ आणि शेतकऱ्यांच्या गंभीर प्रश्नांकडे सरकारने दुर्लक्ष केल्यामुळे भाजप व महायुतीला पराभवाचा धक्का बसल्याची माहिती राज्यातील नेत्यांनी मोदी यांना दिली. सरकारविरोधातील असंतोषामुळे अल्पसंख्यांक, दलित, धनगरांसह मराठा समाजातील मोठा वर्ग महाविकास आघाडीकडे गेल्याचे मोदी यांना सांगण्यात आले. त्यावर हा पराभव विसरून आता विधानसभा निवडणुकीसाठी जोमाने कामाला लागा, अशी सूचना मोदी यांनी महायुतीच्या नेत्यांना केल्याची माहिती सूत्रांनी दिली. लोकसभेतील पराभवातून बाहेर पडून महायुतीमध्ये नवा जोश निर्माण करण्यासाठी पुढील पंधरा दिवसांत राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाकडून केली जाणार असल्याचे सूत्रांनी स्पष्ट केले.

# पाटणा-झारखंड पॅसेंजरला आग; २ डबे जळून खाक



पाटणा : पाटण्याहून जसीडीहला जाणा-या पॅसेंजर ट्रेनमध्ये भीषण घटना घडली आहे. एका डब्याला लागलेल्या आगीमुळे आणखी एक डब्याला आग लागली. आग पसरण्याआधीच डब्यातील प्रवाशांनी उड्या मारून आपले जीव वाचवले. काही मिनिटांत आग ट्रेनच्या दोन डब्यांमध्ये पसरली. यामुळे दोन डबे पूर्णपणे जळून खाक झाले.या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि आगीवर नियंत्रण मिळवण्यास सुरुवात केली. रेल्वेच्या पथकाच्या मदतीने आग विझवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. किउल जंक्शनच्या प्लॅटफॉर्म क्रमांक चारवर ही घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, ही ट्रेन लखीसरायच्या किउल जंक्शनवर डाऊन लाईनवर थांबवण्यात आली होती. दरम्यान, गुरुवारी सायंकाळी उशिरा ट्रेनला भीषण आग लागली. आग लागताच रेल्वेची मधली बोगी जळू लागली. त्यानंतर ट्रेनमध्ये एकच गोंधळ उडाला आणि ट्रेनमधील प्रवासी उडी मारून जीव वाचवण्याचा प्रयत्न करत होते. सध्या अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या घटनास्थळी हजर असून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र आग नेमकी कशी लागली याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. ताज्या माहितीनुसार, आगीमुळे ट्रेनचे अनेक डबे जळून राख झाले आहेत.

# लातूर आय.एम.ए महिला विंग च्या वतीने तीनशे वृक्षाच वृक्षारोपण




लातूर: इंडियन मेडिकल असोसिएशन डॉक्टर्स विंग च्या वतीने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण व्हावी या हेतूने सकाळी सात वाजता ग्रीन लातूर वृक्ष टीम यांच्या संयुक्त विद्यमाने ३०० वृक्षाच वृक्षारोपण केले. या कार्यक्रमास डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, लातूर आय.एम.ए महिला विंगच्या अध्यक्ष डॉ. विमल डोळे, डॉ. मनीषा बरमदे, डॉ. क्रांती साबदे, डॉ. कल्याण बरमदे, एसटी महामंडळाचे पदाधिकारी व ग्रीन लातूर वृक्ष टीमचे सर्व सदस्य उपस्थित होते.

वृक्षारोपणा नंतर आय.एम.ए. महिला विंगच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनी एका प्लास्टिकची दुसरी गोष्ट या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमास ग्रीन वर्क ट्रस्टच्या सौ रुपाली नाईक पुणे यांनी प्लास्टिक कचऱ्याविषयी सखोल असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून डॉ. सुरेखा काळे या उपस्थित होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर महिला विंगच्या अध्यक्ष डॉ. विमल डोळे,डॉ. क्रांती, डॉ. पवन लड्ढा आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. क्रांती यांनी केले, प्रास्ताविक डॉ. विमल डोळे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉक्टर चारुशीला उदगीरकर यांनी केले.

# एनडीएचा फॉर्म्यूला निश्चित; ४ खासदारांमागे १ मंत्रीपद



नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीचा निकाल समोर आल्यानंतर यामध्ये कुठल्याही पक्षाला बहुमत मिळाले नाही. २०२४ च्या निकालात भाजपाला २४० जागांवर समाधान मानावे लागले आहे. बहुमतापासून भाजपाला ३२ जागांनी दूर आहे. मात्र भाजपा प्रणित एनडीएला बहुमत मिळाल्याने पुन्हा इकदा देशात एनडीए सरकार बनण्याचा मार्ग मोकळा आहे. परंतु मोदी ३.० सरकारमध्ये भाजपाला मित्रपक्षांना मोठा वाटा द्यावा लागणार आहे. प्रत्येकी ४ खासदारांमागे एक मंत्रिपद असे हे सूत्र ठरल्याची बातमी पुढे आली आहे.

नितीश कुमार यांच्या जेडीयूला ३ मंत्रिपदे, चिराग पासवान यांना १ कॅबिनेट मंत्रिपद, जितनराम मांझी यांच्या हिंदुस्तान आवाम मोर्चाला १ मंत्रिपद, चंद्राबाबू नायडू यांच्या टीडीपीला ४ कॅबिनेट मंत्रिपदे तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला १ कॅबिनेट आणि १ राज्यमंत्रिपद मिळणार आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादीला १ कॅबिनेट मंत्रिपद, अनुप्रिया पटेल यांच्या अपना दलला १ मंत्रिपद तर जयंत चौधरी यांच्या पक्षाला १ मंत्रिपद आणि पवन कल्याण यांच्या जनसेनेला १ मंत्रिपद देणार असल्याचे सांगितले जात आहे. भाजपा एनडीए सरकारमध्ये महत्त्वाची ४ खाती स्वत:कडे ठेवणार आहे.

भाजपा स्वत:कडे गृह, वित्त आणि संरक्षण मंत्रालयासह आणखी एक महत्त्वाचे खाते ठेवणार आहे. उत्तार प्रदेश, बिहार आणि महाराष्ट्र या तीन राज्यांना डोळ्यासमोर ठेवून महत्त्वाची खाती या राज्यांना दिली जाणार आहेत. एनडीएच्या वाटाघाटीत लोकसभा अध्यक्षपद, अर्थ, गृह आणि रेल्वे मंत्रालयात या खात्यावरून रस्सीखेच सुरू आहे. मात्र गृह आणि अर्थ खाते भाजपा सोडणार नाही. रेल्वे खाते मित्रपक्षांना दिले जाऊ शकते. नितीश कुमार यांनी रेल्वे मंत्रालयासाठी आग्रह धरलेला आहे. त्यामुळे त्यांच्या वाट्याला रेल्वे मंत्रालय जाते का हे पाहणे गरजेचे आहे. दरम्यान, लोकसभा निवडणूक निकालात गेल्या वेळीच्या तुलनेत भाजपाची पिछेहाट झाल्याचे पाहून एनडीएतील घटक पक्षांच्या मागणीत वाढ झाली आहे. प्रत्येक पक्ष अधिकची मंत्रिपदे मागत आहे. एनडीएला २९३ जागांसह बहुमत मिळाले आहे. त्यात भाजपाला २४० जागा, तेलुगु देसम पार्टीला १६ आणि जनता दल यूनाइटेडला १२ जागांवर विजय मिळाला आहे. त्यामुळे जेडीयू आणि टीडीपी हे किंगमेकर बनले आहेत.

# बसपा, वंचित प्रभावहिन



वर्धा : लोकसभा निवडणुकीची मतमोजणी पूर्ण झाली आणि बहुजन समाज पार्टी व वंचित बहुजन आघाडीच्या मतांमध्ये घसरण झाल्याचे समोर आल्याने लोकसभा २०२४ च्या निवडणुकीत बसपा आणि वंचित फॅक्टर 'वंचित' राहल्याचे दिसून आले आहे.

दोन्ही पक्षाच्या उमेदवारांना गेल्यावेळीपेक्षा यावेळी कमी मते मिळाली. त्यामुळे ही 'कॅडर' बेस मते गेली कुठे, असा प्रश्न उपस्थित केला जात असून बसपा आणि वंचित यावेळी प्रभावहीन ठरल्याचे दिसून येत आहे. अठराव्या लोकसभेसाठी वर्धा मतदार संघात दुस-या टप्प्यात २६ एप्रिल रोजी मतदान आटोपले होते. तब्बल एक महिना नऊ दिवसानंतर ४ जून रोजी मतमोजणी झाली. त्यात शरद पवार गटाचे उमेदवार अमर काळे विजयी झाले, तर भाजपचे रामदास तडस पराभूत झाले. या दोघांच्या खालोखाल बसपा आणि वंचितच्या उमेदवारांनी मते घेतली. 'बसपा'चे डॉ. मोहन राईकवार यांना तिस-या क्रमांकाची २० हजार ७९५ मते मिळाली.

'वंचित'चे प्रा. राजेंद्र साळुंखे १५ हजार ४९२ मते घेऊन चौथ्या स्थानी राहिले. मात्र, गेल्यावेळीपेक्षा बसपा आणि वंचितच्या उमेदवारांची मते घटली आहेत. २०१९ मध्ये बसपाचे उमेदवार शैलेशकुमार प्रेमकिशोर अग्रवाल यांना ३६ हजार ४२३ मते मिळाली होती. त्यावेळी वंचितचे उमेदवार धनराज कोठारी यांनाही ३६ हजार ४५२ मते मिळाली होती. या दोघांच्याही मतांची बेरीज ७२ हजार ८७५ होते. यावेळी बसपा आणि वंचितच्या उमेदवारांना एकूण केवळ ३६ हजार २८७ मते मिळाली आहे. अर्थात यावेळी २०१९ मध्ये बसपा आणि वंचितच्या एका उमेदवाराला मिळालेल्या मतांपेक्षाही निम्म्यापेक्षा कमी मते मिळाल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे बसपा आणि वंचितची कॅडर बेस मते नेमकी कुठे गेली, कुणीकडे वळली, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

दहा वर्षांपूर्वी २०१४ मध्ये झालेल्या निवडणुकीत बसपाचे उमेदवार चेतन भीमराव पेंदाम यांना तब्बल ९० हजार ८६६ मते मिळाली होती. त्यावेळी वंचितचा उमेदवार रिंगणात नव्हता. एकूण २१ उमेदवार रिंगणात होते. त्यात आम आदमी पार्टीचे उमेदवार मो. अलीम पटेल मो. वहीद यांनी १५ हजार ७३८ मते घेतली होती. तत्पूर्वी २००४ मध्येही बसपाचे उमेदवार सोमराज तेलखेडे यांनी ५४ हजार नऊ मते घेतली होती. आता ही मते कुठे वळली, हा संशोधनाचा विषय झाला आहे.

२००९ मध्ये लाखाच्यावर मते वर्धा लोकसभा मतदारसंघात बसपा आणि वंचितची ७० हजारांच्यावर मते असल्याचे नेहमी सांगितले जाते. यापूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत ही बाब स्पष्टही झाली आहे. त्यात २००९ मध्ये तर बसपाचे उमेदवार बिपीन कंगाले यांनी तब्बल एक लाख ३१ हजार ६४३ मते मिळवून बसपाची ताकद अधोरेखित केली होती. त्यावेळी विजयी झालेले काँग्रेसचे दत्ता मेघे यांना तीन लाख ५२ हजार ८५३, तर पराभूत झालेले भाजपचे सुरेश वाघमारे यांना दोन लाख ५६ हजार ९३५ मते मिळाली होती. मेघे यांनी वाघमारे यांचा ९५ हजार ९१८ मतांनी पराभव केला होता. विजयी आणि पराभूत उमेदवारांच्या मतांमधील फरकापेक्षा कंगाले यांना तब्बल ३५ हजार ७२५ जादा मते मिळाली होती.

# महायुतीकडून उमेदवार देण्यात चूक झाली का? भुजबळ स्पष्टच बोलले

नाशिक : मराठा आणि ओबीसी आरक्षणात राज्यसरकारने ठोस भूमिका घेतली नसल्याचा फटका राज्यात महायुतीला बसला असून जागावाटप आणि उमेदवारांची निवड चुकल्याचे निकालातून दिसून आले आहे, अशी प्रतिक्रिया देत राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांनी महायुतीला घरचा आहेर दिला आहे.नाशिक व दिंडोरी लोकसभा मतदारसंघात महायुतीच्या उमेदवारांचा पराभव झाला. राज्यातही महायुतीच्या जागा घटल्या. यासंदर्भात भुजबळ यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. काय म्हणाले भुजबळ? शरद पवार आणि उद्धव ठाकरेंबाबत जनतेत सुप्त सहानुभूती होती हे मी आधीच सांगीतले होते.जागावाटप आणि उमेदवारांची निवड चुकल्याचे निकालातून दिसून आले आहे.त्यामुळे योग्य निर्णय घेतले असते तर, पराभव टाळता आला असता अशी भावना भुजबळ यांनी व्यक्त केली आहे.भाजपने आत्मचिंतन करावे भुजबळ म्हणाले की, राज्यातील ६० टक्के ओबीसी मते भाजपला मिळणे अपेक्षित होते; परंतु, तसे झालेले दिसत नाही. त्यामुळे भाजपने आता याबाबत आत्मचिंतन करायला हवे. अनेक गोष्टी एकत्र आल्याने हा पराभव झाला आहे. दिंडोरीत कांद्याबाबत मोठी नाराजी होती. दिंडोरीतील शेतकऱ्यांची मुले नाशिकमध्येच राहतात. लोकांमध्ये उद्रेक होता हे निकालात दिसत आहे. त्यामुळे कांद्याचा फटका नाशिक आणि दिंडोरीत बसल्याचे दिसून आल्याचे भुजबळांनी यावेळी सांगीतले. चारशे पार घोषणेचाही फटका बसला आहे. राज्यात महायुतीच्या विरोधात निकाल आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE